**<u>विशेष दिवाणी दावा क्रमांक ०९/२०१५ मधील</u>**
**<u>निशाणी क्रमांक १०६ खालील आदेश.</u>**

(०१). यातील वादी क्र.०१ यांनी स्वतंत्र पुरावा देणेस परवानगी मिळणे करिता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. वादी यांचे कथन असे की, मुळ वादी क्र.०१ व ०२ यांनी एकत्रीतपणे दावा दाखल केला आहे. या कामी प्रतिवादी यांनी दिलेल्या नि.४६ च्या अर्जाच्या सुनावणीवेळी वादी क्र.०२ यांनी स्वतंत्र वकीलांची नेमणुक करुन त्यांचे मार्फत बाजु मांडली आहे. प्रस्तुत वादी यांनी मुळ वकील कायम ठेवलेले आहेत. उभयता वादी यांना आपापल्या वकीलांचे मार्फत बाजु मांडणेची आहे. सबब हा अर्ज.

(०२). वादी क्र.०१ यांनी त्यांचे म्हणने दाखल करुन वादी क्र.०२ च्या अर्जास त्यांची हरकत नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी प्रतिवादी क्र.०७ यांनी नि.१०७ येथे दिलेले म्हणने स्विकारले आहे. त्यांचे कथन असे आहे की, वादीचा अर्ज कायद्याच्या कोणत्याही चौकटीत बसत नाही. दोन्हा वादींनी दाव्यास दिनांक १५/०३/२०१४ रोजी कारण घडले असे कथन केले आहे, तसेच दाव्यातील तक्रारी देखील एकच आहेत. सबब वादींना स्वतंत्र पुरावा देता येणार नाही.

(०३). अर्ज, दावा, सोबत दाखल कागदपत्रे यांचे तसेच प्रतिवादी क्र.०१ व ०२ आणी ०७ यांचे या अर्जास दाखल म्हणने याचे वाचन केले. दोन्ही बाजुच्या विद्वान वकीलांचा विस्तृत युक्तीवाद ऐकला. कबुल तथ्यानुसार वादी क्र.०१ ते ०२ यांनी प्रस्तुतचा दावा एकत्रीतपणे दाखल केला आहे. वादींचे कथन असे आहे की, निशाणी ४६ च्या अर्जाच्या सुनावणीवेळी वादी क्र.०२ यांनी स्वतंत्र वकीलांची नेमणुक करुन त्यांचे मार्फत बाजु मांडली आहे. प्रस्तुत वादी यांनी मुळ वकील कायम ठेवलेले आहेत. स्वतंत्र पुरावा देणे आणी वेगळा/विरुध्द पुरावा देणे या बाबी पुर्णत: भिन्न

आहेत. वादी यांचे असे कथन नाही की, वादी क्र.०२ यांनी वादी क्र.०१ च्या हिताविरुध्द कथने केली आहेत किंवा पुराव्यात तसे कथन केले आहे. सर्वसाधारणपणे वादींनी त्यांच्या मागण्यांकरिता एक दावा दाखल केला असेल तर त्यांचे वकील देखील एकच असने अपेक्षित असते. कारण सहवादी यांनी सुयुक्त दावा केला असल्याने त्यांचे म्हणने देखील एकमेकाशी सुसंगत असने आवश्यक असते. जर दावा दाखल करताना वादी एकत्र असतील आणी नंतर जर प्रत्येक वादींनी स्वतंत्र भुमिका मांडायची ठरवले तर दाव्यात निष्कारण गुंतागुंत निर्माण होण्याची आणी विनाकारण सुनावणीस विलंब होण्याची देखील शक्यता निर्माण होते. केवळ एका वादींनी वेगळया वकीलांची नेमणुक केली म्हणुन या वादींना स्वतंत्र भुमिका मांडणे गरजेचे आहे असे मला वाटत नाही. जर वादींचे परस्परातील हितसंबंध एकमेका विरुध्द झाले असतील तर मग ते एकत्रीतपणे वादीच राहु शकत नाहीत आणी अशा परिस्थीतीत काही वादींना प्रतिवादी म्हणुन स्थानांतरीत (Transpose) करणे गरजेचे होते. परंतु येथे तशी परिस्थती नाही. या करिता प्रतिवादी क्र.०७ च्या विद्वान वकीलांनी ना. मुंबई उच्च न्यायालयाच्या 'ए.आय.आर १९६१ मुंबई ९४, व्यंकटराव वि. नारायणलाल बन्सीलाल' या निवाड्याचा आधार घेतला आहे की ज्यामध्ये परिच्छेद क्रमांक ०२ (०३) मध्ये '***When persons undertake the prosecutions of a suit they must make up their minds whether they will become co-plaintiffs; for if they do, they must act together. I cannot allow one of several plaintiffs to act separately from and inconsistently with others. In fact, I never expected any reported case on this question, because, in my opinion, the practice of one or more counsel appearing for all the co-plaintiffs in a suit jointly and not severally both here and in***

***England has been so uniform and conformed that there would not be any possibility of any question ever arising of different plaintiffs in one suit being represented by different counsel. The case cited by the learned Government Pleader, however, clears up any difficulty or doubt that might have never existed in regard to this question*** ' असे निर्देशित केले आहे. हा न्यायनिर्णय या कामी तंतोतंत लागु पडतो. या तथ्यांचा विचार करता आणी प्रस्तुत अर्ज कायद्याच्या चौकटीत बसत नाही याचा विचार करता, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आ दे श**

| | |
|---|---|
| **०१.** | निशाणी १०६ वरील अर्ज नामंजुर करण्यात येतो. |
| **०२.** | अर्जाचा खर्च दाव्याचे खर्चात समाविष्ट राहील. |

KIRAN RAJARAM KHONDRE
Digitally signed by KIRAN RAJARAM KHONDRE
Date: 2026.01.07 12:25:04 +0530

**कऱ्हाड.** **(किरण खोंद्रे)**
**दिनांक:०६ जानेवारी २०२६.** **०३रे सह दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,**
**कऱ्हाड, जि. सातारा.**